महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

## राज्यशास्त्र विभाग

## महिला नेतृत्व कौशल्य विकास

### अहवाल (शुक्रवार, 7 मार्च 2025)

आज शुक्रवार, 7 मार्च 2025 रोजी सकाळी 09:00 वा. राज्यशास्त्र विभागामध्ये राष्ट्रीय महिला दिनानिमित्त राज्यशास्त्र व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **'महिला नेतृत्व कौशल्य विकास'** या विषयावर प्रा. सुजाता चोपडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. के खडसे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकेत महिला दिनाचे महत्व अधोरेखित केले. मार्गदर्शक प्रा. सुजाता चोपडे यांनी प्राचीन काळापासून स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत सर्व जगभर आणि विशेषता भारतात स्त्रियांच्या अवस्थेचे चित्रण केले. त्यानंतर त्यांनी भारतात महात्मा फुले, सावित्रीबी फुले, ताराबाई शिंदे तसेच अन्य स्त्रियांनी महिलांच्या शोषणविरुद्ध कसा आवाज उठविला हे स्पष्ट केले. त्यांनी स्त्रियांना आज उपलब्ध असणाऱ्या अधिकारांच्या मागे कोणकोणत्या स्त्रियांनी कोणकोणता त्याग केला व त्यातून स्त्रिया उभ्या राहिल्या याविषयी विस्ताराने मार्गदर्शन केले. आज स्त्रीवादासंबंधी जगभर कोणते प्रवाह निर्माण झालेले आहेत याचे मार्मिक विश्लेषण त्यांनी केले. भारतात सद्यकाळात घडलेल्या अनेक घटनांचा दाखला देवून त्यांनी स्त्रियांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठविण्याची जबाबदारी स्त्रियांबरोबरच पुरुषांचीही असून आपण सर्वांनी आपल्या मानसिकतेत बदल करण्याची गरज स्पष्ट केली. आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्रा. चंद्रकांत भारसकळे यांनी आजच्या काळात स्त्री ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रात अग्रेसर असून त्यांच्यात निसर्गाने निर्माण केलेल्या भेदाच्या पलीकडे कोणताही भेद शिल्लक राहीला नसल्याचे आग्रही प्रतिपादन केले. भारतीय संविधानाने स्त्री आणि पुरुषांमध्ये कोणताही भेद न केल्यामुळे आपणही त्याचे अनुसरण केले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. अंगद पाटील यांनी व्यक्त केले. या व्याख्यानासाठी सुमारे 60 विद्यार्थी उपस्थित होते.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist. Sangli. 415 409




स्वागत व प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. एस. के. खडसे




मार्गदर्शन करताना प्रा. सौ. सुजाता चोपडे




मार्गदर्शन करताना प्रा. सौ. सुजाता चोपडे आणि उपस्थित विद्यार्थी व मान्यवर




अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना वाणिज्य विभागप्रमुख प्रा. चंद्रकांत भारसकळे




आभार व्यक्त करताना डॉ. अंगद पाटील